किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● जागृत

५● निद्रेचे उत्खनन

११● हरवलेले जग

१७● जागतिक श्रमविश्वात डोकवताना...

२३● चर्चा वस्तू व सेवा करप्रणालीची...

२९● जिकडेतिकडे

- पक्ष्यांमधील घटस्फोट
- हेरांची देहबोली



**खंड १४ : अंक २** **मे २०१५**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,

९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,

(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७

ई-मेलः- ispe@vsnl.net

website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**

**खंड १४ (अंक २) मे २०१५**

**संपादक - अभय टिळक**

**निर्मिती-सहभाग - गिरिजा देशमुख**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# जागृत

अखंड सावधान असणे, ही आजच्या काळात जगण्याची निकड बनलेली आहे. एकंदरच आपल्या सगळ्यांच्या जीवनातील अनिश्चितता प्रचंड प्रमाणात वाढलेली दिसते. जगण्याला एकंदरच इतका वेग आलेला आहे की नजीकच्या काळाबद्दलही काही एक भाकिते करणे दुस्तर ठरू लागलेले दिसते. त्यांमुळे, भविष्याबाबतचे आपण आज बांधत असलेले आडाखे कितपत बरोबर ठरतील याची आशंका दिवसेंदिवस मनीमानसी दाटत जाते. या अस्थिरतेवर मात करण्याचा आपल्या हातात असलेला उपाय एकच - आणि तो म्हणजे सतत जागरूक आणि जागृत असणे. येणाऱ्या उद्याच्या गर्भात काय मांडून ठेवलेले आहे याची चिंता करत झोप उडण्यापेक्षा सततची सावधानता जोपासणे केव्हाही श्रेयस्करच. पण, माणसाने कधीही सलग आणि बिनघोर झोपूच नये, अशी बहुधा निसर्गाची योजना असावी. मुळात, माणूस कधी एके काळी दोन टप्प्यांमध्येच झोप घेत असे, असा आताशा संशोधकांच्या हाती येत असलेला पुरावा तरी त्याच शक्यतेकडे निर्देश करतो. रात्रीची पहिली झोप झाल्यानंतर अवचितच जाग आल्यावर मग खूप वेळ झोप न येण्याचा प्रकार आपल्यापैकी अनेकांना अपरिचित नाही. निरुपायाने लादली गेलेली ती अवेळीची जागृती आपल्यातील काही तरी वैगुण्याचा तर पुरावा नाही ना, अशी शंका दोन टप्प्यांतील झोपेसंदर्भात अलीकडे चालू असलेल्या संशोधनाचा या अंकात मांडलेला गोषवारा वाचल्यानंतर तरी दूर व्हावी. सतत जागरूक राहून भवतालाकडे निरखून पाहण्याच्या पुरातत्त्ववेत्यांच्या दक्षतेमुळेच सुदूर भूतकाळात गडप झालेल्या संस्कृतींचा शोध कसा अवचितच लागतो, याचा या अंकातील दाखला तसाच मननीय ठरतो. हीच सावधानता उत्तरोत्तर अस्थिर बनत आलेल्या आर्थिक पर्यावरणासंदर्भातही जपणे इथून पुढे अगत्याचे ठरणार आहे. २००८ सालातील वित्तीय अरिष्टाचे ढग विरळ होऊपाहत असले तरी जगभरातील रोजगारविषयक चित्राचा गडद गहिरपणा अजूनही निवळायला तयार नाही. रोजगारनिर्मिती आणि रोजगार निर्मितीचा वेग यांचे देशोदेशींचे रंग अजूनही अस्पष्टच आहेत. सगळ्यांत चिंतेची बाब म्हणजे, श्रमदलात



नव्यानेच दाखल होणाऱ्या तरुणाईला चांगल्या दर्जाचा हमीदार रोजगार उपलब्ध करून देण्याचे आव्हान नजीकच्या भविष्यात तरी कमालीचे कडवे ठरेल, असा तज्ज्ञांच्या अभ्यासांचा निष्कर्ष दिसतो. एकीकडे शिक्षणाची सर्वसाधारण पातळी जगभरातच उंचावत असताना सुशिक्षित तरूणांच्या होतकरूहातांना उत्पादक व कल्पक स्वरूपाचा रोजगार पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी एकंदरीनेच जागतिक समुदायाला इथून पुढच्या काळात अतिशय डोळसपणे प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल, असे दिसते. आपल्या देशातील अप्रत्यक्ष करांची आजवरची उभी व्यवस्थाही एका अतिशय मोठ्या आणि मूलभूत स्थित्यंतराच्या पर्वातून वाटचाल करते आहे. वस्तू व सेवा कराची येऊघातलेली प्रणाली देशातील वेगवेगळ्या राज्यांपुढे निरनिराळी आव्हाने उभी करेल, याचे बऱ्यापैकी स्पष्ट पूर्वसंकेत या करप्रणालीसंदर्भातील सध्याच्या चर्चाविश्वातून प्रसृत होताना दिसतात. एकंदरीनेच, कमालीची दक्षता बाळगण्याखेरीज पर्याय नाही. ■■

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

इतिहास

# निद्रेचे उत्खनन

इतिहासकार Roger Ekirch यांचे 'At Day's Close : Night in Times Past' हे पुस्तक साधारण दहा वर्षांपूर्वी प्रसिध्द झाले. पुस्तकाचा अनोखा विषय बघून असंख्य वाचकांच्या त्यावर उड्या पडल्या. हे पुस्तक लिहिण्यापूर्वी Ekirch यांनी २००१साली एक शोधनिबंध प्रसिध्द केला होता. आपल्या संशोधनासाठी ऐतिहासिक संदर्भांचा अभ्यास करताना त्यांना काही गंमतीशीर दाखले मिळाले. हे सर्व दाखले एकत्र केल्यावर आणि त्यांची संगती लावल्यावर त्यांच्या संशोधनाची दिशाच बदलली. झपाटल्याप्रमाणे त्यांनी प्राचीन आणि मध्ययुगीन दैनंदिनी पिंजून काढल्या. न्यायालयीन कागदपत्रे, वैद्यकीय पुस्तके इतकेच नाही तर इंग्रजी वाङमयाचाही अभ्यास केला. अखेर १६ वर्षांच्या अथक संशोधनानंतर 'औद्योगिक क्रांतीपूर्वी पाश्चात्य लोक रात्रीची झोप सलग न घेता दोन टप्प्यांत घेत असत', अशा अजब निष्कर्षाप्रत हा संशोधक आला. Ekirch यांचा तो शोधनिबंध वाचून त्या वेळी अनेकांच्या भुवया उंचावल्या. आपले पूर्वज असे काही जगावेगळे करत होते यावर अनेकांचा विश्वासच बसला नाही. म्हणून Ekirch यांनी आपल्या विधानाला बळकटी देण्यासाठी, पाचशेहून अधिक संदर्भ आणि दाखले असलेले 'At Day's Close : Night in Times Past' हे पुस्तक वाचकांच्या हाती ठेवले. या पुस्तकात होमरच्या 'Odyssey' पासून ते नायजेरियातील आधुनिक भटक्या जमातींच्या मानववंशशास्त्रीय माहितीपर्यंत अनेक उदाहरणांची रेलचेल सापडते.

**काय होते ते संशोधन :**

औद्योगिक क्रांतीच्या आधीच्या काळात विजेचे दिवे नव्हते. तेलाचे किंवा मेणाचे दिवे त्या काळात असत पण ते सर्वांनाच परवडत नसत. त्यामुळे सूर्यास्त झाला की, रस्त्यांवर आणि घरांमध्ये अंधाराचेच साम्राज्य असे. अशा वेळी चोर-लुटारू आणि भुताखेतांच्या भीतीने लोक घराबाहेर भटकण्यापेक्षा घरात राहणेच पसंत करत.



पण घरी राहूनही करायचे काय, म्हणून सूर्यास्त झाला की, एक-दोन तासांनी ते सरळ झोपी जात. चार तासांची सलग झोप झाली की उठत आणि एक-दोन तास जागे राहून पुन्हा झोपी जात. त्यांची ही दुसरी झोपही चार तासांची असे. मग सकाळी उठून नवीन दिवसाला सुरु वात करत. मध्यरात्री दोन झोपांच्यामध्ये जाग आल्यावर, दिवसभराच्या श्रमानंतर काहीशी विश्रांती मिळाल्याने पुन्हा ताजेतवाने होत आणि कामाला लागत. त्या वेळी कुणी प्रार्थना म्हणत, कुणी चिंतन करत तर कुणी व्यायाम करत. काही विद्वान आणि कवी मंडळी लिखाण आणि वाचन करत. काही जण शेजारीपाजारी जाऊ न गप्पा मारत. जागेपणीच्या या वेळेचा उपयोग माणसे कसा-कसा करत याचे काही मजेशीर संदर्भ Ekirch यांना मिळाले. मध्यरात्री म्हटल्या जाणा-या प्रार्थनांची १५ व्या शतकातील काही हस्तलिखिते त्यांना सापडली. त्याचबरोबर, १६ व्या शतकातील एका फ्रेंच डॉक्टरने लिहिलेले प्रिस्क्रिप्शनही मिळाले आहे. त्यात या डॉक्टरने त्याच्या रु ग्णांना जागेपणीच्या त्या काळात शरीरसंबंध ठेवण्याचा सल्ला दिसल्याचा दाखला मिळतो. प्रिस्क्रिप्शनसारख्या इतरही काही पुराव्यांमधून Ekirch यांना गंमतीशीर धागेदोरे हाती लागले. ते म्हणतात की, दोन झोपांच्यामधील हा जागेपणीचा काळ गर्भधारणेसाठी अत्यंत अनुकूल होता. दिवसभर काम करून थकल्यानंतर नाही तर पहिली झोप काढून ताजेतवाने झाल्यानंतरचा काळ प्रणयाराधनासाठी अधिक अनुकूल ठरतो.

एकंदरीतच, दोन निद्रांमधील जागेपणीचा हा काळ या लोकांच्या जीवनशैलीचा महत्त्वपूर्ण भाग होता असे दिसते. पहिली झोप झाल्यानंतर विश्रांतीमुळे लोक ताजेतवाने व निवांत होत. त्या वेळी त्यांना एका अनामिक शांतीचा प्रत्यय येत असे. तीच त्यांना अधिक क्रियाशील बनवत असेल का, असा प्रश्न अनेक संशोधकांना पडला आहे. Ekirch यांनी आपला शोधनिबंध सादर केल्यावर काही इतिहासकारांनी त्यातील सत्यता पडताळून पाहून Ekirch यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला आहे. Craig Koslofsky या इतिहासकाराने तर या विषयावर 'Evening's Empire' हे पुस्तकही लिहिले आहे. इतिहासकारांनंतर आता मानसोपचार तज्ज्ञ, मेंदूतज्ज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञांनीही आपला मोर्चा या विषयाकडे वळवला आहे.

'माणसाला अधिक क्रियाशील बनवणारा आणि विलक्षण शांती देणारा जागेपाणीचा काळ' हा या सर्वांचा संशोधनाचा विषय आहे. आजच्या ताणतणावयुक्त जीवनशैलीचा आणि दोन झोपांच्यामधील जागेपणीच्या काळाचा काही संबंध आहे का याचा शोध घेऊन त्याआधारे निद्रानाशावर, मानसिक आजारांवर उपचार करण्याचे प्रयोग चालू आहेत.

*दोन झोपांचे संदर्भ मिळवण्यासाठी पाश्चात्य साहित्य, त्यांचे शब्दकोश Ekirch यांनी धुंडाळले. इंग्रजी वाङमयातून खूप रंजक माहिती त्याच्यापुढे उलगडत गेली. 'Odyssey' या होमरच्या काव्यात 'First sleep' चा उल्लेख त्याला मिळाला आणि विशेष म्हणजे १७ व्या शतकापर्यंत त्याचा अर्थ 'आधीची झोप' किंवा 'पहिली झोप' या अर्थानेच घेतलेला दिसला. पण विसाव्या शतकापासून मात्र त्याचा अर्थ चुकीचा लावला जाऊ लागला. पहिल्या आणि दुस-या झोपेची वर्णने १७ व्या आणि १८ व्या शतकातील अनेक साहित्यिकांच्या साहित्यात सापडतात. उदाहरणार्थ-*

*"Don Quixote followed nature, and being satisfied with his first sleep, did not solicit more. As for Sonche, he never wanted a second, for the first lasted him from night to morning"* Miguel Cervantes **(Don Quixote)**

**जागेपणामागील विज्ञान :**

David Randall हा संशोधक आपल्या 'Dreamland : Adventures in the Strange Science of Sleep' या पुस्तकात म्हणतो की, दोन झोपांच्यामधील या काळात प्रोलॅक्टिन नावाचे संप्रेरक पीयुषिका (Pituitary) ग्रंथींद्वारे मोठ्या प्रमाणावर स्रवले जाते. त्यामुळे शारीरिक क्रियांच्या पातळीवर काही बदल होतात आणि अनामिक शांतीची अनुभूती मिळते. Russel Foster हा मेंदूतज्ज्ञ (Circadian Neuroscientist) म्हणतो की, प्रोलॅक्टिनमुळे शांत वाटते आणि तीच जाणीव जाग येण्याशी संबंधित असावी. ही 'Hypnogogic'(गाढ झोप लागण्यापूर्वी) आणि 'Hypnopompic'(झोपून उठल्यानंतर) अवस्थांसारखी अवस्था असावी.



Foster यांच्या मते दोन झोपांच्यांमधील हा निवांतपणा माणसाला त्याचा ताण नियंत्रित करण्यासाठी खूप आवश्यक असतो. ब-याच ऐतिहासिक वर्णनात Ekirch यांनाही असे दिसले की, बहुतेक लोक हा वेळ मनन-चिंतनात घालवत असत. आज आपल्यापाशी असा स्वतःमध्ये डोकावण्यासाठी वेगळा वेळच नाही. त्यामुळे आधुनिक काळात चिंता, नैराश्य, ताण, व्यसनाधीनता यांचे प्रमाण वाढले आहे. औद्योगिक क्रांतीनंतर विजेच्या दिव्यांचे आगमन झाले आणि माणसांची झोपेची ही पध्दत हळू-हळू बदलत गेली. Ekirch यांच्या म्हणण्यानुसार १७ व्या शतकाच्या अखेरीला या झोपेचे संदर्भ कमी होऊ लागले. युरोपातील उच्चमध्यमवर्गीयांपासून या बदलाला सुरुवात झाली आणि पुढच्या दोन शतकांत हा बदल जगभर झिरपत गेला. १९२० सालानंतर तर दोन टप्प्यांतील ती झोप जनमानसातून कायमची पुसली गेली.

**आधुनिक काळातील आरोग्यसमस्या आणि झोप :**

काही संशोधकांच्या मते रात्रीच्या वेळी दोन टप्प्यांत घेतली जाणारी झोप हीच आपली मूळ प्रकृती आहे आणि ती उत्क्रांतीच्या माध्यमातून आपल्याला मिळाली आहे. Wehr यांच्यासारख्या शास्त्रज्ञांनी आधुनिक काळात परिस्थिती अनुकूल असेल, तर माणसाच्या झोपेचा मूळ कल कसा असू असेल हे प्रयोगातून आजमावून पाहिले आणि दोनदा येणारी झोप हीच आपली मूळ प्रकृती आहे, असा दावा केला.

*थॉमस वेर (Wehr) या संशोधकाने १७ व्या शतकातील परिस्थिती पुन्हा निर्माण झाली, तर माणूस त्याला कसा प्रतिसाद देईल हे आजमावण्यासाठी एक प्रयोग केला. त्याने एका खोलीमध्ये आठ निरोगी लोकांना महिनाभरासाठी बंद केले. अकरा तासांचा दिवस आणि चौदा तासांची रात्र असा दिनक्रम ठेवला. सुरुवातीला आठजण अकरा तास झोपत असत. काही दिवस हाच प्रकार चालू राहिला. परंतु, कालांतराने हे सर्वजण काळोख होताच थोड्या वेळाने झोपी जाऊ लागले. मध्यरात्री चार तासांनी त्यांना जाग येई. एक-दोन तास जागेपणीचे गेले की, ते पुन्हा झोपी जात आणि चार तासांनी उठून नवा दिवस सुरु करत.*

**Craig Koslofsky *या इतिहासकाराने आपल्या* *'Evening's Empire'* *या पुस्तकात माणसाचा प्रवास दोन टप्प्यांतील झोपेच्या टप्प्याकडून एका झोपेच्या टप्याकडे कसा होत गेला याचा रंजक आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.***

- *१७ व्या शतकापूर्वी रात्रीचे नाते चोर, लुटारु, शरीरविक्रय यांसारख्या अनैतिक कृत्यांशी निगडीत होते. श्रीमंतांना तेलाचे, मेणाचे दिवे परवडत. पण त्यावर खर्च करण्यापेक्षा तो खर्च ते अन्य गोष्टींवर करणे पसंत करत. रात्री उशीरापर्यंत जागणे हे चांगले लक्षण मानले जात नसे.*
- *ही परिस्थिती युरोपातील राजकीय आणि सामाजिक स्थित्यंतराच्या काळात बदलली. प्रॉटेस्टंट आणि कॅथलिक लोक रात्रीच्या वेळी गुप्तपणे सामुहिक प्रार्थनांचे आयोजन करू लागले. पूर्वी रात्रीच्या वेळी बहुशः अनैतिक कृत्येच केली जात. पण आता प्रतिष्ठित लोकही त्यांचे हेतू साध्य करण्यासाठी रात्रीच्या काळोखाचा वापर करू लागले.*
- *कालांतराने हा बदल चर्चच्या बाहेर पडून सामान्यांपर्यंत पोचला. परंतु तोवर दिवे ही सामान्य माणसासाठी चैनीचीच गोष्ट होती.*
- *१६६७ साली सर्वांत प्रथम पॅरिसमध्ये पदपथावरील दिवे आले. काचेच्या पात्रात मेणबत्त्या लावून पदपथ उजळले जात. त्या नंतर अवघ्या दोनच वर्षांनी ॲमस्टरडॅमचे पदपथही दिव्यांनी उजळले.*
- *लंडनमध्ये १६८४ मध्ये पदपथावरील दिवे आले आणि १७ वे शतक संपताना पन्नासहून अधिक युरोपीय शहरे दिव्यांनी उजळून निघाली.*
- *दिव्यांमुळे रात्री अधिक रंगीबेरंगी झाल्या आणि रात्री नुसतेच बिछान्यात पडून राहणे म्हणजे वेळेचा अपव्यय आहे, असे मानले जाऊ लागले. वेळेचा जास्तीतजास्त उपयोग करण्याच्या बाबतीत लोक दक्ष होऊ लागले. औद्योगिक क्रांतीने तर या दृष्टिकोनात कमालीचा बदल घडवून आणला. १८२९ सालातील वैद्यकीय नियतकालिकात याचे पुरावे सापडतात.*
- *त्या पुढील काळात नवीन पिढीची जडणघडण करताना पालकांनीच मुलांना दोन टप्प्यांतील झोपेच्या संकल्पनेतून पूर्णपणे बाहेर काढले.*



वेगवेगळ्या संशोधकांचे नैसर्गिक झोपेच्याबाबतीतील हे गृहीतक मान्य केले तर आजच्या आरोग्यविषयक समस्यांचे मूळ झोपेत आहे असे समजायचे का? आजच्या काळातील डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार आधुनिक काळातील ३० टक्के समस्या झोपेशी निगडीत आहेत. मानसिक ताणतणावांमुळे अनेकांना निद्रानाशासारखे (Sleep maintenance insomnia) विकार जडले आहेत. विशेष म्हणजे Ekirch यांना अशा प्रकारच्या आजारांची वर्णने १९ व्या शतकातील साहित्यात पहिल्यांदा दिसली. आजही ब-याच लोकांना मध्यरात्री नेमाने जाग येते आणि झोपेअभावी हतबल होऊन आढ्याकडे पाहात बिछान्यात नाइलाजाने पडून राहावे लागते. या लोकांना झोपेची समस्या आहे म्हणावे की अजूनही मूळच्या दोन टप्प्यांतील झोपेचा हा प्रभाव म्हणावा? जर दोनदा येणारी झोप ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती असेल तर आजची आपली सलग आठ तासांच्या झोपेची कल्पना आरोग्याला हानीकारक आहे का? या समस्येतून मार्ग काढण्यासाठी मूळ झोपेच्या प्रवृत्तीकडे वळणे एवढाच पर्याय आहे का?... या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न संशोधक करत आहेत.

काही अभ्यासकांना मात्र वाटते की, संशोधनाचे फलित काहीही असले तरी पुन्हा दोन टप्प्यांतील झोपेच्या परिपाठाकडे वळणे अवघड आहे. त्यासाठी १७ व्या शतकातील परिस्थिती पुन्हा निर्माण करावी लागेल. आणि आजच्या काळात, जिथे रात्रीलाही दिवसाचे महत्त्व आले आहे आणि विजेशिवाय आयुष्याची आपण कल्पनाही करु शकत नाही, त्या काळात असा अट्टहास बाळगणे चुकीचे आहे. उलट, आपली सध्याची आठ तासांच्या सलग झोपेची संकल्पनाच आपल्यासाठी योग्य आहे. कारण, सलग आठ तास झोपल्याने आरोग्यावर काही दुष्परिणाम होतात असे कुठल्याही प्रयोगांती अद्याप तरी सिध्द झालेले नाही. शेवटी आठ तासांची झोप हा बदलदेखील माणसाने स्वतःमध्ये परिस्थितीनुरूप केलेला बदल आहे. त्या अर्थाने तो उत्क्रांतीमधील एक टप्पाच आहे. त्यामुळे आपण घेतो ती एकच झोप आठ तास अधिक शांत आणि गाढ कशी घेता येईल याचा विचार करणे आपल्या दृष्टीने अधिक श्रेयस्कर नाही का ?

■■

पुरातत्त्व

# हरवलेले जग

पुरातत्त्वाचा शोध हा माणसाचा स्थायीभाव आहे. या शोधयात्रेत कधी अकल्पित क्षणी त्याच्या हाती एखाद्या संस्कृतीचा सुवर्णकलश येतो आणि त्याचे सारे आयुष्य उजळवून जातो. पुरातत्त्वाचा इतिहास बघता बहुतेक संस्कृतींच्या पाउलखुणांचा शोध हा असाच अनपेक्षितपणे लागला आहे. २४ जुलै १९११ या दिवशी हायरॅम बिंगम (Hiram Bingham) हे इतिहासकारही असेच सुदैवी ठरले. इंका संस्कृतीची अखेरची राजधानी शोधण्यासाठी म्हणून Bingham निघाले आणि त्यांना गवसले माचुपिचूसारखे इंका संस्कृतीचे अतिभव्य, देखणे प्रासादचिन्ह ! माचुपिचूच्या शोधाला २०११ साली शंभर वर्षे पूर्ण झाली आणि Bingham यांच्या त्या शोधयात्रेला नव्याने उजाळा मिळाला.

इंका ही दक्षिण अमेरिकेतील महत्त्वाची प्राचीन संस्कृती! पेरु देशाच्या पश्चिम भागात अँडीज पर्वतरांगांमध्ये इंका लोकांचे वास्तव्य होते. कुस्को ही त्यांची राजधानी आणि केच्वा ही त्याची बोलीभाषा होती. आपली उत्पत्ती सूर्यापासून झाली असे ते मानत. 'इंका' म्हणजे राजा आणि 'कुस्को' म्हणजे नाभी ! बाराव्या शतकात उदय झाल्यापासून सोळाव्या शतकात अस्त होईपर्यंत इंका साम्राज्य कोलंबिया, इक्वेदोर, पेरु, चिले, अर्जेंटिना आणि बोलिव्हिया असे अर्ध्याहून अधिक अमेरिकेमध्ये पसरले होते. थोडक्यात इंका हे दक्षिण अमेरिकेचे सार्वभौम राजे होते. त्यांच्या आधिपत्याखाली असलेल्या सर्व प्रदेशाची कुस्को ही नाभी होती. पंधराव्या शतकात इंका त्याच्या उत्कर्षबिंदूवर असतानाच कोलंबस अमेरिकेत दाखल झाला आणि युरोपातील साम्राज्यवादी राष्ट्रांना आपले पाय पसरण्यासाठी आणखी जागा मिळाली. साम्राज्यविस्ताराबरोबरच या देशांतील सोन्याच्या आणि चांदीच्या साठ्यांनी त्यांना भुरळ घातली. सर्वप्रथम स्पॅनिश या भूमीवर अवतरले. १५२० मध्ये त्यांची नजर पेरु कडे गेली.



अमेरिकेच्या दक्षिण भूभागावर राज्य करायचे तर इंकांचा पाडाव करणे क्रमप्राप्त आहे, हे त्यांनी ओळखले. त्याच काळात इंका राज्यात दुही माजली होती. त्याचा फायदा घेत आपल्या आधुनिक शस्त्रांच्या साहाय्याने आणि कपटी डावपेचांनी त्यांनी चारशे वर्षे चालत आलेले इंका साम्राज्य नेस्तनाबूत केले. या भागातील त्यांचे नामोनिशाण पुरते मिटवून टाकले आणि अशारितीने पुढची तीनशे वर्षे इंका संस्कृती विस्मृतीच्या गर्तेत विसावली.

१९११ साली अमेरिकी इतिहासकार आणि येल विद्यापीठातील व्याख्याता हायरॅम बिंगम इंका संस्कृतीच्या शोधात अँडीज पर्वतांच्या या डोंगररांगांत येऊन दाखल झाले. बिंगम व्याख्याता असले तरी त्यांना शिकवण्यापेक्षा संशोधनातच जास्त रु ची होती. त्यांना इंकांची शेवटची राजधानी आणि लष्करी ठाणे असलेल्या विल्काबांबाचा (Vilcabamba) शोध घ्यायचा होता. या आधी १९०९ मध्ये ते या ठिकाणी आले होते. पण भर पावसाळ्यात आल्याने हाती फारसे काही लागले नव्हते. या वेळी मात्र त्यांनी ती चूक पुन्हा केली नाही. एखादी घटना घडायचीच असेल तर सगळ्या गोष्टी जुळून येतात असे म्हणतात. तीच परिस्थिती बिंगमच्या बाबतीतही झाली. या वेळी ते जय्यत तयारीनिशी आले होते. या विषयातील काही जाणकार सहकारीही त्यांच्यासोबत होते. शिवाय कार्लोस रोमेरो (Carlos Romero) आणि सर क्लेमेन्टस मर्कहॅम (Sir Clements Markham) या पेरु तील दोन संशोधकांनी आपले अमूल्य संशोधनही त्यांच्या सुपूर्द केले होते. स्पॅनिशांनी इंकांवर विजय मिळवला त्या काळातील काही ऐतिहासिक दस्तावेज त्यांना मिळाले होते. त्यावर संशोधन करु न मर्कहॅम यांनी 'The Incas of Peru' हा शोधनिबंध त्या वेळी नुकताच प्रसिध्द केला होता.

बिंगम स्वतः तज्ज्ञ संशोधक नसले तरी या विषयाचे, त्यातील विविध संदर्भग्रंथांचे आणि स्रोतांचे त्यांना उत्तम ज्ञान होते. सतत नावीन्याचा ध्यास, चिकाटी आणि मिळेल त्या संधीचे सोने करण्याची वृत्ती हे गुणही त्यांच्याकडे होते. पण १९११ सालच्या या शोधमोहिमेत एक महत्वाची गोष्ट त्यांच्या बाजूने होती आणि ती म्हणजे नशीब ! आपल्या नशिबात

काय आहे हे कुणालाही सांगता येत नाही. बिंगमलाही २४ जुलैला मोहिमेला सुरु वात केली तेव्हा आपल्या पुढ्यात काय मांडून ठेवले आहे याची पुसटशीही कल्पना नव्हती. या भागात दाखल झाल्यापासून बिंगमने अनेक स्थानिक लोकांना हाताशी धरु न आजुबाजूचा पारिसर पिंजून काढला होता. काही अवशेषांचे उत्खननही केले होते. पण त्यातील कुठल्याच अवशेषांचे वर्णन विल्काबांबाशी (Vilcabamba) जुळणारे नव्हते. २३ जुलैच्या रात्री पुढच्या मोहिमेची आखणी करत असताना बिंगमचा स्थानिक वाटाड्या मेल्चर अर्टिगा (Melchor Arteaga ) म्हणाला की, त्यांच्या मुक्कामाच्या तळापासून काही अंतरावरच असलेल्या माचुपिचू नावाच्या उंच कड्यावर बरेच पुरावशेष आहेत, काही स्थानिक शेतक-यांना त्या विषयी माहिती आहे. पण अजूनही कुणी जाणकार व्यक्ती तिथे फिरकलेली नाही. स्थानिक वाटाड्याने केलेले हे वर्णन ऐकून बिंगमने दुस-याच दिवशी त्या उंच डोंगरावर जाण्याचा बेत पक्का केला.

कुस्को ही इंकांची राजधानी अँडीज पर्वतरांगेच्या धारेवर अदमासे तीन हजार मीटर उंचीवर वसली आहे. कुस्कोच्या बाजूने उरु बंबा नदी वाहते. ही नदी कुस्कोच्या पश्चिमेकडून वाहत येऊन उत्तरेकडे जाते आणि शेवटी पूर्वेकडे जाऊ न पुढे ॲमेझनला नदीला मिळते. बिंगम यांनी कुस्कोच्या या पठारावरु न उतरु न उरु बंबा नदीच्या खो-यात येण्याचे ब-याच विचारांती नक्की ठरवले. उरु बंबा नदी तिच्या वर्तुळाकार मार्गादरम्यान असंख्य दरडीतून, खिंडींतून मार्ग काढत वाहत जाते. तिच्या आजुबाजूला डोंगरांचे तुटलेले बेलाग कडे दिसतात, ते विल्काबांबा म्हणून ओळखले जातात. बिंगम यांनी हे कडे खालच्या उरु बंबा नदीकडून चढायचे ठरवले. हा सगळा चढ अत्यंत खडा होता. पण बिंगम यांच्या सुदैवाने खो-यातील जंगलातून रबर आणण्यासाठी खेचरांची फेरी नुकतीच सुरु झाली होती. या पूर्वी पर्यटक Ollantaytambo येथे येऊ न नदीची साथ सोडत आणि उंचावरच्या खिंडीतून माऊं ट व्हेरोनिकाला वळसा घालून पुन्हा नदीच्या बाजूचा मार्ग धरत. त्यामुळे माचुपिचूच्या आजुबाजूचा परिसर त्यांच्या कधीच दृष्टीस पडला नाही. नदीच्या उतारावरील अडचणी टाळण्यासाठी हा मार्ग अत्यंत सोयीचा होता.



बिंगम यांच्या काळात पिचू खो-याकडे फार कमी पर्यटक येत असत. पेरु आणि चिले यांच्यातील युध्दामुळे आलेल्या मंदीचा हा परिणाम असावा. त्यामुळेच खाणींची कामेही बराच काळ बंद होती आणि खाणकाम करणारी मंडळी चरितार्थासाठी शेतीकडे वळली होती. बिंगमला याची काहीच कल्पना नसावी. त्यामुळे इथे आल्यावर आजुबाजूला हिरवीगार शेती बघून त्यांना वाटले की, हा पूर्वापार शेतक-यांचा आणि मेंढपाळांचा प्रदेश असावा.

२४ जुलैचा दिवस उजाडला. पहाटेच पावसाने हलकी हजेरी लावल्याने हवा कुंद होती. वातावरणच असे निरु त्साही असल्याने बिंगमही मोहिम सुरु करण्यासाठी फारसे उत्साही नव्हते. त्यांच्या हॅरी फूट (Harry Foote) आणि विल्यम एर्विंग (William Erving) या दोघा सहका-यांनी आपली नकारघंटा आधीच कळवली होती. या वातावरणात टेकडी चढून वरचे भग्नावशेष बघण्यात त्यांना आजिबात रस नव्हता. बिंगमने सकाळी दहा नंतर आपला तळ सोडला. काही हजार फुटांचा कडा त्यांना सर करायचा होता. सूर्य ढगातून बाहेर आला होता आणि ऊ न्हे तापू लागली होती. बिंगमने बरोबर शिधाही बांधून घेतला नव्हता. या निर्णयाचा मात्र त्यांना नंतर खूप पश्चात्ताप झाला. एखाद्या उत्कंठावर्धक कादंबरींमध्ये शोभेल असे वर्णन बिंगमने आपल्या पुस्तकात त्याच्या या प्रवासाचे केले आहे. ते म्हणतात,

“I made the ascent without having the least expectation that I would find anything at the top.There is the ever present possibility of lethal snake capable of making considerable springs when in pursuit of their prey,”

बराच डोंगर चढून आल्यावर बिंगम यांना एक पठार लागले. त्यावर दूरपर्यंत बरेच कठडे दिसत होते. काही भग्नावस्थेत होते तर काही सुस्थितीत होते. पुढे गेल्यावर कबरस्थान आणि काही पाय-या लागल्या. सर्वांत शेवटी त्यांच्यासमोर उंच आणि भव्य इमारती आल्या. यात काही मंदिरे होती, देखण्या हवेल्या होत्या. या इमारती विशाल आणि सुंदर घडीव दगडातून बांधण्यात आल्या होत्या. काही ठिकाणी दगडी कोरीव

काम केलेल्या गुंफा होत्या. सगळे अवशेष झाडांनी, वेलींनी आच्छादलेले होते. शेतीसाठी साफसूफ केलेली जमीन सोडली तर सगळीकडे झाडे उगवल्याने बिंगमला त्या जागेविषयी ठोस काहीच ठरवता आले नाही. पण एकंदरीतच त्या बांधकामाचा, त्यावरील श्रीमंतीचा डौल बघून आपण दक्षिण अमेरिकेतील सर्वांत मोठ्या अवशेषांच्या सान्निध्यात आहोत याची त्यांना खात्री पटली. बिंगमने पूर्ण दुपार अवशेषांच्या सान्निध्यात घालवली आणि काही प्राथमिक टिपणे, मोजमापे आणि छायाचित्रे घेऊन परतीचा मार्ग धरला. आपण डोंगरावर काय पाहिले याची काहीच वाच्यता त्यांनी आपल्या सहका-यांपाशी केली नाही. दुस-या दिवशी बिंगम आणि त्यांच्या सहका-यांनी घराकडे प्रस्थान ठेवले. आपण अपूर्व असे काही पाहिले याविषयी इतरांना काहीच न सांगण्याचे बिंगमने का ठरवले असावे? त्या जागेची महती त्यांना पुरेशी कळली नव्हती का? की या शोधाचा उपयोग कसा करून घ्यावा या विषयी त्यांच्या मनात संदेह होता?

माचुपिचूचे महत्त्व कालांतराने बिंगमच्या लक्षात आले. ज्या अर्थी या स्थळाला आजवर कुणी प्रसिध्दी दिलेली नाही, त्या अर्थी कुस्कोमधील पुरात्त्वअधिकारीच काय लिमा आणि अमेरिकेतील अधिकारीही याबाबतीत अनभिज्ञ आहेत याची त्यांना खात्री पटली. अमेरिकेला परतल्यावर मात्र त्यांनी या जागेविषयीच्या सर्व शक्यतांचा अभ्यास करणे सुरु केले. १९१२ साली ते परत तिथे आले. नॅशनल जिऑग्राफिक आणि येल विद्यापीठाने त्यांना त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. या वेळी माचुपिचूच्या परिसरात त्यांनी चार महिने वास्तव्य केले आणि त्यावर फिरलेला निसर्गाचा हात पुसून काढला. त्याला आजचे रुप मिळवून दिले. १९१४ आणि १९१५ साली त्यांनी येथील अवशेषांचे उत्खनन केले आणि त्याचे महत्त्व जगातील संशोधकांसमोर मांडले. बिंगमला इंका साम्राज्याची शेवटची राजधानी विल्काबांबाचा शोध घ्यायचा होता. माचुपिचूचे भव्य अवशेष बघून हेच विल्काबांबा असावे अशी त्यांची धारणा झाली. पण ही राजधानी इतक्या उंचीवर कशी, असा प्रश्न त्यांना पडला. इंकांचा पहिला सम्राट मोनॅको (Monaco) याचे जन्मस्थळ असावे असेही काही काळ त्यांना वाटले. बिंगमनंतर बरेच संशोधक माचुपिचूला पोचले आणि मग आणखी वेगवेगळी



गृहितके समोर यायला लागली. येथील उत्खननात स्त्रियांचे सव्वाशे सांगाडे मिळाले. ज्या स्त्रियांनी आपले आयुष्य इंकाच्या सूर्यदेवतेला समर्पित केले होते अशा स्त्रियांचे ते सांगाडे असावेत असे काही संशोधकांना वाटले. पण त्या सांगाड्यातील निम्मे सांगाडे पुरुषांचे आहेत हे नंतर सिध्द झाले. १९४८ साली प्रसिध्द झालेल्या आपल्या पुस्तकात इतर कोणतीच गृहितके सिध्द न झाल्याने ते विल्काबांबाच असावे असा दावा बिंगमने केला. पुढे काही वर्षांनी मात्र माचुपिचूपासून ८० मैल अंतरावर जंगलात बिंगमलाच मूळ विल्काबांबाचा शोध लागला. विल्काबांबाचे गूढ उकलले पण त्या मुळे माचुपिचूचे अधिकच गहिरे झाले.

उंच डोंगरांनी वेढलेल्या एका शिखराच्या खांद्यावर माचुपिचू विसावले आहे. समोरच माचुपिचूहून उंच असा वायना पिचू आणि आजुबाजूला अनेक निनावी डोंगर आहेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे इंकांच्या इतर शहरांच्या तुलनेत माचुपिचूची फारशी पडझड झालेली नाही. स्पॅनिशांच्या आक्रमणात इतर शहरे जमिनदोस्त होत असताना माचुपिचू कसे काय वाचले, असा प्रश्न संशोधकांना पडला. माचुपिचूचा उल्लेखही त्यांना कुठल्याच स्पॅनिश कागदपत्रांत सापडला नाही. त्यामुळे स्पॅनिश इथवर पोचूच शकले नसावेत याबद्दल त्यांना खात्री पटली. माचुपिचू बांधला तो काळ, त्याचे स्वर्गीय स्थान आणि ते बांधण्यामागचा उद्देश यांचा ताळमेळ घातल्यानंतर मात्र संशोधक अशा निष्कर्षाप्रत आले की, माचुपिचू हे इंका सम्राट पाचाकुतेक (Pachacuti ) याने साधारण १४५० मध्ये बांधले असावे. पाचाकुतेक हा इंकांमधील महापराक्रमी राजा होता. त्याने आपल्या कारकिर्दीत कुस्कोच्या आसपासचा बराच प्रदेश जिंकून इंका साम्राज्याचा मोठा विस्तार केला. या नगरीचा थाट पाहता ती त्याने राज्यातील मान्यवर आणि अधिका-यांना निसर्गसहवासात विश्रांतीसाठी, शिकारीसाठी उभी केली असावी असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. माचुपिचू जगाच्या पर्यटन नकाशावर येऊनही आता शंभर वर्षे झाली. पण अद्यापही त्याचे सौंदर्य उणावलेले नाही. सौंदर्य शापित असते असे म्हणतात. माचुपिचूने तीनशे वर्षे हा शाप भोगला आणि हायरॅम बिंगमच्या पदस्पर्शाने एका अर्थी त्याचा उध्दार झाला असेच म्हणावेसे वाटते. ■■

आर्थिक

# जागतिक श्रमविश्वात डोकवताना...

अमेरिकी 'सब्प्राइम' कर्जांच्या २००८ साली फुटलेल्या फुग्यामुळे मुळापासून हादरलेली जागतिक अर्थव्यवस्था अजूनही पूर्ण आणि नीट सावरलेली दिसत नाही. त्या हाद-यानंतर आता जवळपास सात वर्षे उलटत आली. जगाची अर्थव्यवस्था आताशा मान पुन्हा उचलायला लागलेली आहे. परंतु, ही हलचल जगाच्या सगळ्या भागात एकसारखी दिसत नाही. आर्थिक गतिमानता वेगवेगळ्या देशांत निरनिराळ्या पद्धतीने दृग्गोचर होते आहे. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड आणि अमेरिकेसारख्या काही विकसित देशांमध्ये आर्थिक आगेकूचीचा दर २०१५ या चालू वर्षात अधिक उंचावेल असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या काही निरीक्षकांचे अदमास सांगतात. यंदा अमेरिकी अर्थव्यवस्थेतील ठोकळ उत्पादन तीन टक्क्यांची वाढ नोंदवेल, असे भाकित वर्तवले जाते. २००६ सालानंतर हे पहिल्यांदाच घडावे. कच्च्या खनिज तेलाच्या वैश्विक बाजारपेठेत तेलाच्या दरांत अलीकडील काळात घडून येत असलेली घसरण, सर्वसामान्य अमेरिकी नागरिकाच्या माथ्यावरील कर्जाच्या बोज्यात झालेली वा होत असलेली घट आणि मुख्य म्हणजे, अमेरिकी उद्योगांनी पुन्हा एकवार गुंतवणुकीकडे वळवलेला त्यांचा मोहरा... यांसारख्या काही उत्साहवर्धक घटकांचा हा एकत्रित परिणाम असावा, असे काही अर्थतज्ज्ञांचे विश्लेषण आहे. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील या धुगधुगीचा फायदा शेजारच्या कॅनडालाही संभवतो. वाढती निर्यात आणि देशी गुंतवणूक या दोहोंच्या आधारे कॅनडाची अर्थव्यवस्था यंदा अडीच टक्क्यांनी पुढे सरकेल, असे वाटते. तर, निर्यातीवाढीने दिलेला हात आणि देशी बांधकामक्षेत्राने घेतलेली उचल यांच्या एकत्र टेकूद्वारे न्यूझीलंडची अर्थव्यवस्था यंदा जवळपास साडेतीन टक्क्यांची वाढ नोंदवेल, अशी चिन्हे दिसतात. त्याच वेळी, देशांतर्गत दमदार मागणीची ऊ ब मिळाल्याने ऑस्ट्रेलियाची अर्थव्यवस्थाही वाढीचा तीन टक्क्यांचा टप्पा गाठेल.



अर्थात, जगभरात सगळीकडेच असे दिलासादायक चित्र आहे, अशातलाही भाग नाही. २००८ सालात उद्भवलेल्या वित्तीय संकटाचा दणका बसलेला युरोपीय समुदाय अजूनही धड उभा राहताना दिसत नाही. २०१४ सालात युरोपीय समुदायाच्या एकत्रित अर्थव्यवस्थेतील ठोकळ उत्पादन वाढले अवघ्या १.३ टक्क्यांनी. मंदीमुळे निर्माण झालेल्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी युरोपीय समुदायातील विविध देश प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतात. सरकारी तिजोरीतील तुटीला कात्री लावण्यावर जवळपास सगळ्यांचाच भर आहे. सरकारी खर्चांबाबत हात आखडता घेण्याकडे वाढलेला कल हा त्याच 'फिस्कल कन्सॉलिडेशन'च्या प्रयत्नांचा एक भाग. देशी मागणी मलूल असल्याने निर्यातवाढीकडे सगळ्यांचेच लक्ष. आपापल्या उद्योगांची वैश्विक स्पर्धात्मकता वाढावी यासाठी वेतनदरातील वाढ सौम्य राखण्यावर विविध युरोपीय देशांचा सध्या कल दिसतो. परंतु, उद्योगांची स्पर्धात्मकता वाढण्यात अथवा बेरोजगारीच्या प्रमाणात घट होण्यात या उपायांची परिणती काही होताना दिसत नाही.

आर्थिक वाढविकास आणि रोजगारनिर्मिती यांचे एकमेकांशी घट्ट नाते असल्यामुळेच जगभरातील आर्थिक आगेकूचीचा देशवार अथवा प्रदेशवार असा आढावा तपशीलाने इतका वेळ घेतला. २००८ सालातील वित्तीय हाद-यामुळे हाललेली जागतिक अर्थव्यवस्था सावरण्याची चिन्हे दिसत असली तरी बेरोजगारीचे वैश्विक आव्हान मात्र अजूनही तितकेच कडवे आहे. रोजगारवाढीची मात्रा २००८ पूर्वीच्या पातळीपर्यंत पुन्हा एकवार उंचावणे, हे आव्हान अपेक्षेपेक्षाही अधिक टणक शाबीत होते आहे. रोजगारनिर्मितीच्या आघाडीवरील चित्र आज आहे त्यांपेक्षा अधिक आशादायक बनण्याच्या शक्यता येत्या पाच वर्षांदरम्यान तरी दुबळ्याच दिसतात, असा जागतिक श्रम संघटनेचा सांगावा आहे. किंबहुना, रोजगाराचे चित्र येत्या भविष्यात अधिकच खालावेल अशी भीती जागतिक श्रम संघटनेच्या अगदी अलीकडील अभ्यासात वर्तवण्यात आलेली आहे. २०१४ साली अदमासे २० कोटी लोक जगभरात बेरोजगार होते. चालू वर्षात या संख्येत तब्बल ३० लाख लोकांची भर पडावी. तर, बेरोजगारांच्या या संख्येत त्या नंतरच्या चार वर्षांदरम्यान आणखी ८० लाखांची वाढ अंदाजित आहे.

**जटिल समस्या तरु णाईच्या रोजगाराची**

या सगळ्या नरमगरम वातावरणात सर्वांत जटिल समस्या उभी ठाकते आहे ती तरु णाईच्या रोजगाराची. २००८ साली उद्‌भवलेल्या वित्तीय संकटातून निष्पन्न झालेल्या मंदीपायी जगभरात सुमारे सहा कोटी लोकांना त्यांच्या रोजगारास मुकावे लागले. येत्या पाच वर्षांच्या काळात श्रमदलात पडणारी भर जमेस धरता जागतिक अर्थव्यवस्थेत एकंदर २८ कोटी रोजगार अथवा नोक-या २०१९ सालापर्यंत निर्माण करण्याचे आव्हान आपल्या सगळ्यांच्याच पुढ्यात आहे. त्यांतल्या त्यांतही तुलनेने मोठा बांका प्रसंग ओढवणार आहे तो तरु णांवर. बेरोजगारीचे आजचे चित्र असे दिसते की, प्रौढांमधील बेरोजगारीच्या जागतिक सरासरी प्रमाणापेक्षा जवळपास तिपटीने अधिक बेरोजगारी नांदताना दिसते ती तरू णांमध्ये. इथे आपण चर्चा करतो आहोत ती वय वर्षे १५ ते २४ या वयोगटातील होतकरू तरु णांची. बरे, तरु णांमधील बेरोजगारीचे तुलनेने अधिक असणारे हे प्रमाण काही देशांपुरते अथवा समूहांच्या पुंजक्यांपुरतेच सीमित नाही. जगभरात सर्वत्रच हा अनुभव येतो. अधिक गंभीर बाब म्हणजे, जगात सगळीकडेच शिक्षणाची पातळी सरासरीने उंचावत असतानाही हे चित्र दिसते. सुशिक्षित तरु णांना जाणवणा-या दर्जेदार रोजगारसंधींच्या तुटवड्यापायी निर्माण होत असलेले वा होऊपाहणारे सामाजिक ताणतणाव तर अनंत प्रकारचे आहेत. युरोपीय समुदायाचे सदस्य असणा-या २८ देशांचा विचार केला तर, २०१४ सालातील दुस-या तिमाहीमध्ये प्रौढांमधील बेरोजगारीचे सरासरी प्रमाण तिथे नऊ टक्क्यांच्या आगेमागे होते. परंतु, त्याच २८ देशांमधील श्रमदलातील तरु णाईमधील बेरोजगारीचे सरासरी प्रमाण मात्र तब्बल २२ टक्क्यांच्या घरात होते. युरोपीय समुदायातील देशांमध्ये तरू णांमधील बेरोजगारीचे असणारे हे प्रमाण प्रौढांमधील बेरोजगारीच्या प्रमाणाच्या जवळपास अडीच पट अधिक भरते !

वित्तीय संकटानंतरच्या गेल्या पाच वर्षांचा विचार केला तर बेरोजगारीच्या समस्येचे स्वरूप स्थळपरत्त्वे बदलताना दिसते आहे. जपान, अमेरिका यांसारख्या प्रगत देशांमधील बेरोजगारीच्या सरासरी प्रमाणात वा दरात अलीकडील काळात घट होत असल्याचे आकडेवारी सांगते.



परंतु, युरोपीय समुदायातील देशांसमोरील बेरोजगारीचा पेच मात्र कठीण आहे. वित्तीय संकटाच्या कुशीतून निपजलेल्या बेरोजगारीच्या प्रश्नाचा सामना करण्यासाठी युरोपीय समुदायातील देशोदेशांतील सरकारांनी धोरणात्मक प्रतिसाद म्हणून नाना प्रकारची पावले उचललेली दिसतात. देशोदेशींच्या उद्योगव्यवसायांची जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढवण्यावर या धोरणांचा मुख्य रोख आजवर राहिलेला आहे.

विशेषतः, दक्षिण युरोपीय देशांमधील बेरोजगारीच्या प्रमाणात घट अनुभवास येण्याचा वेग अतिशयच मंद असल्याचे आजवर ठळकपणे दिसलेले आहे. रोजगारांना असलेल्या नानाविध संरक्षणांमध्ये कपात जारी करणे, कामगारांना दिल्या जाणा-या अथवा देय असणा-या किमान वेतनदरामध्ये घट घडवून आणणे, रोजगाराशी संलग्न विविध सेवाशर्तींबाबत मालकाशी किंवा कारखानदारांशी सौदेबाजी करण्याच्या (बार्गेनिंग पॉवर) श्रमिकांच्या क्षमतेचा -हास करवणे... अशांसारखे उपाय व्यवहारात जारी करू न आपापल्या अर्थव्यवस्थेतील उद्योगांची वैश्विक स्पर्धात्मकता वाढवण्याचा प्रयत्न युरोपीय समुदायातील देश करताना दिसतात. मात्र, बेरोजगारीच्या संकटाचे मळभ तरीही विरळ होत असल्याचा अनुभव तिथे प्रकर्षाने काही येताना दिसत नाही. स्पेन, ग्रीस यांसारख्या युरोपीय देशांमधील वेतनाच्या वास्तव दरात २०११ सालापासूनच सरासरी चार ते आठ टक्क्यांची घट घडून आलेली आहे. परंतु, या देशांतील उद्योगव्यवसाय घटकांनी निर्माण केलेल्या वस्तू व सेवांच्या वैश्विक स्पर्धात्मकतेची मात्रा वाढण्यात या वेतनकपातीची परिणती घडून येत असल्याचे दाखले काही तिथे अजूनही मिळताना दिसत नाहीत. केवळ इतकेच नाही तर, या देशांतील अर्थव्यवस्थांच्या तुलनेने कमी उत्पादक क्षेत्रांकडून श्रमशक्तीचे स्थलांतर अधिक उत्पादकता असणा-या व्यवसायक्षेत्रांकडे गतिमान बनत असल्याची ठसठशीत उदाहरणेही तिथे सापडत नाहीत.

अशांसारखे उपाय योजल्याने निर्यातीस चालना मिळत असल्याची चिन्हे स्पेनसारख्या देशात दिसतातही. परंतु, अर्थव्यवस्थेच्या एकंदर चलनवलनाला अनेकविध अशा संरचनात्मक मर्यादांची कुंपणे पडल्याने निर्यातवाढीचा म्हणावा असा प्रभाव व्यवहारात जाणवत नाही.

कमजोर असणारी देशी मागणी, दुर्धर बनलेली कर्जउभारणी, कठोर अशी बाजारपेठीय नियमने, कमकुवत असणारे आर्थिक व्यवस्थापन, मलूल होऊन पडलेले व्यावसायिक पर्यावरण, नवसंशोधन व विकासासाठी गुंतवणूक करण्याबाबत असलेला अनुत्साह, निकृष्ट अशा पायाभूत सेवासुविधा, आर्थिकदृष्ट्या सक्रिय वयोगटातील श्रमिकांमध्ये जाणवणारा कौशल्यांचा अभाव... अशा अनंत संरचनात्मक मर्यादांची कुंपणे आताशा फार जाचक ठरत आहेत.

**वेतनवाढ आणि उत्पादकता वाढ**

वित्तीय संकटाच्या उद्‌भवानंतर जगभरातच रोजगारवाढीच्या वार्षिक सरासरी वेगामध्ये घट झालेली आहे. १९९१ ते २००७ या १७ वर्षांच्या काळात रोजगारवाढीचा वार्षिक सरासरी दर जागतिक पातळीवर १.७ टक्के इतका होता. तर, २००७ ते २०१४ या आठ वर्षांदरम्यान जागतिक स्तरावर रोजगारवाढीचा हाच वार्षिक सरासरी दर १.२ टक्क्यांवर उतरल्याचे दिसते. बेरोजगारीच्या जागतिक चित्रामध्ये विकसित देशांच्याबाबतीत २०१४ या वर्षामध्ये दिसलेले रंग ब-यापैकी आशादायक होते. या संदर्भात विकसनशील देशांचा अनुभव मात्र बरोबर विरुद्ध दिसतो.

रोजगारातील वाढ आणि सर्वसाधारण आर्थिक आगेकूचीचा वार्षिक सरासरी वेग या दोन्ही बाबतींत २००८ सालानंतर विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशांमधील चित्राचे रंग खूपच उजळ होते. परंतु, अलीकडील आकडेवारी बघितली तर, रोजगाराच्या आघाडीवर विकसनशील देशांमधील चित्राचे रंगही उडायला लागल्याचे वास्तव प्रकर्षाने पुढ्यात अवतरते. लॅटिन अमेरिकेतील देश, कॅरेबियन बेटसमूह, चीन, रशिया, आखातातील अनेक अरब देश अशा जगाच्या विविध भागांत बेरोजगारीचे आव्हान उत्तरोत्तर गहिरे होत जात असल्याचे ध्यानात येते. आफ्रिका खंडाचा सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडे असलेला भूभाग (सब्-सहारन आफ्रिका) या संदर्भात विशेष उल्लेखनीय ठरावा. या प्रांतात आर्थिक वाढविकासाची वार्षिक सरासरी गती अगदी आताआतापर्यंत चांगल्यापैकी आश्वासक अशीच होती. असे असूनही, रोजगाराच्या आघाडीवरील या प्रांतातील विद्यमान चित्र कमालीचे निस्तेज दिसते.



खुल्या बेरोजगारीचा दर अथवा सरासरी प्रमाण फारसे भीतीदायक नसले तरी कोणत्याही प्रकारच्या संरक्षक जाळ्याचे छत्र नसलेल्या असंघटित क्षेत्रात रोजीरोटी कमावणा-यांचे एकंदर श्रमिकांमध्ये असणारे अतिशय मोठे प्रमाण हे अनेकानेक विकसनशील देशांमधील श्रमांच्या बाजारपेठेचे एक मुख्य लक्षण ठरत आलेले आहे. विकसनशील देशांमधील एकंदर बेरोजगारीचे आव्हान आणि असंघटित क्षेत्रात एकवटलेल्या उदंड रोजगाराची समस्या येत्या काळातही प्रखर राहील, असे तज्ज्ञांचे प्रतिपादन आहे.

विकसित देशांमधील रोजगार-बेरोजगारीच्या या चित्राचा आणखीही एक पैलू लक्षवेधक आहे. तो म्हणजे वेतनवाढीचा. इथे नोंद घेण्यासारखी लक्षणीय बाब म्हणजे विकसित अर्थव्यवस्थांमध्ये वेतनदरांतील सरासरी वाढ मंद व क्षीणच आहे. केवळ इतकेच नाही तर, श्रमिकांच्या वेतनदरातील वाढ आणि त्यांच्या सरासरी उत्पादकतेमधील वाढ यांतील तफावतही वाढताना दिसते. दर श्रमिकाची सरासरी उत्पादकता चढती भाजणी दर्शवत असली तरी सरासरी वेतनातील वाढ मात्र रेंगाळतानाच दिसते. जागतिक श्रम संघटनेच्या अभ्यासानुसार वेतनदरातील वाढ येत्या काळात सर्वत्र नेमस्तच राहावी.

यांतील अधिक लक्षणीय बाब म्हणजे श्रमिकांची सरासरी उत्पादकता आणि कामगारांना मिळणारा सरासरी मेहेनताना यांत आजघडीला अनुभवास येणारी तफावत येत्या काळात दूर होण्याची चिन्हे आज तरी अंधुकच दिसतात. किंबहुना, बेरोजगारीतील बदलांना वेतनदराचा मिळणारा प्रतिसाद २००९ सालानंतर तुलनेने क्षीण झालेला जाणवतो. या वास्तवाला कारणभूत असणारे घटकही बव्हंशी संरचनात्मक स्वरूपाचेच दिसतात. रोजगाराबाबत भांडवलदाराशी सौदेबाजी करण्यासंदर्भातील श्रमशक्तीची ओसरलेली क्षमता आणि लांबलेल्या बेरोजगारीमुळे श्रमदलात बळजोर बनलेली अन्य संरचनात्मक कारणे यांचा प्रभाव इथे भारी जाणवतो. वित्तीय संकटाद्वारे निपजलेल्या मंदीमुळे रोजगार गमावलेल्या श्रमिकांनी अथवा रोजगाराच्या शोधात असलेल्या नवथर होतकरूंनी अर्धवेळ आणि/किंवा अल्प मोबदल्यात उपलब्ध रोजगार स्वीकारण्यासारख्या प्रवृत्ती श्रमदलात मूळ धरू लागल्याचा हा परिणाम असावा, असा अभ्यासकांचा कयास आहे. ■■

आर्थिक

# चर्चा वस्तू व सेवा करप्रणालीची...

वस्तू आणि सेवा कराची प्रणाली आपल्या देशात लागू करायची तर त्यासाठी आवश्यक असणारी प्रशासनिक पूर्वतयारी बरीच मोठी आणि चांगल्यापैकी गुंतागुंतीची आहे. ही पूर्वतयारी चांगली भक्कम केल्याखेरीज वस्तू व सेवा कराची व्यवहारातील अंमलबजावणी निर्वेध व निर्दोष होणे दुरापास्त ठरेल. कारण, अखेर ज्याला आपण करधोरण म्हणतो ते वास्तवात करप्रशासनच असते. शेवटी धोरणाला आकार प्राप्त होतो तो प्रशासनामुळेच. आपल्या देशातील आयकराच्या प्रणालीचा दाखला या संदर्भात उद्‌बोधक ठरतो. आयकराशी निगडित प्रशासकीय स्वरूपाचे मूलभूत बदल आपल्या व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर झालेले आहेत असे अजिबात नाही. परंतु, प्रगत तंत्रज्ञानासारख्या एका साध्या पैलूचा अंगीकार केल्याने धोरणामध्ये कोणत्याही स्वरूपाचे पायाभूत बदल न घडवून आणताही दरवर्षी सरासरीने १८ ते २० टक्क्यांची वाढ आयकराद्वारे सरकारला मिळणा-या महसुलामध्ये १९९७-९८ सालापासून घडून येताना दिसते. संगणकाधारित तंत्रज्ञानाचा करविषयक व्यवस्थापनामध्ये अंतर्भाव केल्यामुळे करविषयक प्रशासनाची कार्यक्षमता किती उंचावू शकते, याचे हे एक बोलके उदाहरण. म्हणजेच, करप्रशासन सुधारणे ही धोरणविषयक सुधारणांची गुरु किल्ली ठरते.

सेवाउद्योग क्षेत्राचा वाढता पसारा हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक व्यवच्छेदक लक्षण गणले जाते. केवळ देशी ठोकळ उत्पादितामध्येच नव्हे तर, देशातील अनेक राज्यांच्या राज्यउत्पादितामध्येदेखील सेवाउद्योग क्षेत्राचा वाटा अतिशय भरीव स्वरूपाचा दिसतो. परंतु, विस्मयाची बाब म्हणजे, देशातील प्रचलीत करप्रणालीमध्ये या वास्तवाचे प्रतिबिंब पुरेपूर उमटताना अगदी अलीकडेपर्यंत दिसत नव्हते. सेवाउद्योग क्षेत्र करव्यवस्थेच्या कक्षेबाहेरच राहण्याने करांचा पाया मुळातूनच संकुचित राहत आला. दुसरीकडे, केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांच्या महसूलविषयक गरजा दिवसेंदिवस विस्तारत होत्या.



यातून एक व्यस्त व्यवस्था निपजली. करांचा पाया विस्तारण्याला पायबंद पडल्याने संकुचित राहिलेल्या पायावरच अधिक दराने करआकारणी करून महसुलामध्ये वाढ घडवून आणण्याखेरीज शासनयंत्रणेला अन्य पर्यायच उरला नाही. यांतून करदात्यांवरील करांचा बोजा वाढता राहिला. आपल्या देशातील करव्यवस्थेमधील ही संरचनात्मक त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने १९९४ साली प्रथमच पावले उचलली गेली. सेवांना करांच्या जाळ्यामध्ये आणण्यासाठी वित्त कायद्यामध्ये केंद्र सरकारने १९९४ या वर्षात प्रथम आवश्यक ती सुधारणा केली. ही एक मोठी गंमतच आहे. आपल्या व्यवस्थेमध्ये विक्री कर, अबकारी कर अशांसारख्या करांच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कायदे आहेत. मात्र, सेवाकराची तामिली करण्यासाठी वेगळा असा सेवा कर कायदा आपण आजही निर्माण केलेला नाही. वित्त कायद्यामध्येच वेळोवेळी अनुरूप असे बदल घडवून आणत सेवांचा अंतर्भाव करांच्या जाळ्यात घडवण्याचा परिपाठ आपण चालू ठेवलेला आहे. वित्त कायद्यामध्ये जारी होत राहिलेल्या या सुधारणांच्या माध्यमातूनच आपल्या व्यवस्थेत स्वतंत्र असा सेवा कर कायदा आकार धारण करतो आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

या बदलाचे अपेक्षित परिणाम व फायदे केंद्र सरकारच्या महसुलामध्ये प्रतिबिंबित होताना दिसत आहेत. या बदलाचे लाभदायक परिणाम केंद्र सरकारला उपभोगायला मिळत आहेत तर मग लाभाची तीच फळे राज्य सरकारांच्या मुखातही का पडू नयेत, असा विचार साहजिकच यथावकाश सुरू झाला. आता, मुळात सेवांवर करआकारणी करण्याचा अधिकार केंद्र सरकारला बिनबोभाट कसा मिळाला, असाही सवाल उपस्थित केला गेला. परंतु, त्याचा उलगडा करणे सोपे होते. कारण, घटनेतील तरतुदींनुसार, केंद्र तसेच राज्यांच्या सामाईक सूचीमध्ये अंतर्भाव नसलेले सर्व अवशिष्ट विषय आपसूकच केंद्राच्या अधीन होतात अथवा राहतात. सेवांवर कर आकारणी नेमकी कोणी करावयाची हा मुद्दा प्रथमपासूनच संदिग्ध असल्यामुळे साहजिकच करआकारणी करण्याचा प्रस्ताव विचारविश्वात प्रवेशल्यानंतर त्या बाबतचे अधिकार केंद्राकडे गेले. त्यांमुळे, सेवाकराच्या आकारणीमुळे मिळणारे लाभ केंद्राच्या ओंजळीत पडावेत, हे ओघानेच आले.

**मुख्य रेटा राज्यांचा**

मग, केंद्राप्रमाणेच राज्यांनाही हा अधिकार का नसावा, हा मुद्दा वेगाने चर्चाविषय बनला आणि तो हिरिरीने चर्चिलाही जाऊ लागला. त्यांतल्या त्यांतही, महाराष्ट्रासारख्या राज्यांच्या लेखी हा मुद्दा अधिकच जिव्हाळ्याचा होता. कारण, महाराष्ट्रासारख्या राज्याची अर्थव्यवस्था ही पूर्वापारच सेवाउद्योगप्रधान राहिलेली आहे. राज्य ठोकळ उत्पादितामध्ये सेवाउद्योग क्षेत्राचा वाटा जवळपास ५७-५८ टक्क्यांच्या घरात आहे. एवढ्या विस्तारलेल्या सेवाक्षेत्राकडून सेवा कराच्याद्वारे जमा केल्या जाणा-या महसुलाकडे केवळ बघत बसायचे आणि संकलित झालेल्या सेवा करापैकी केंद्रीय वित्त आयोग जो वाटा पदरात घालील त्यावरच संतुष्ट राहायचे, ही बाब आर्थिक-औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्यांना बोचायला लागली.

सेवा कराचा अधिकार राज्यांना द्यायचा किंवा नाही, या प्रश्नाला आणखीही एक पैलू आहे. सेवा कराची आकारणी व वसुली करण्याचा अधिकार राज्यांना द्यावयाचा की संकलन केल्या जाणा-या सेवा कर महसुलातील वाटा काय तो राज्यांकडे फक्त सरकवायचा, हा दुसरा मुद्दाही तितकाच विचारार्ह ठरत आलेला दिसतो. त्यांमागील कारणही तितकेच रोचक आहे. अनेकदा व्यवहारात घडते असे की, सेवा पुरविणारा अथवा निर्माण करणारा एका राज्यात असतो व त्याने पुरविलेल्या सेवेचा उपभोग दुस-याच राज्यात घेतला जातो. मग, अशा परिस्थितीमध्ये त्या सेवेवर कर कोणत्या राज्याने आकारायचा हा मुद्दा चर्चाविषय बनतो. ज्या राज्यात सेवेचा पुरवठादार अथवा निर्माता आहे त्याने त्या सेवेवरील कराची आकारणी व वसुली करावयाची की, ज्या राज्यात त्या सेवेचा प्रत्यक्ष आणि अंतिम उपभोग घेतला गेला अथवा जाणार आहे त्या राज्य सरकारने आकारणी व वसुली करावयाची, याचा निवाडा या परिस्थितीमध्ये करणे मग क्रमप्राप्त ठरते. अशाच एका प्रश्नाचा निवाडा आपण १९५०च्या दशकात पूर्वी केलेला सापडतो. तो मुद्दा होता विक्री करासंदर्भातील. एका राज्यात तयार करण्यात आलेली वस्तू ज्या वेळी दुस-या राज्यात विकली जाते त्या वेळी त्या व्यवहारावर कोणत्या दराने विक्री कर आकारावयाचा, हा मुद्दा त्या वेळी उपस्थित झालेला होता.



हा मुद्दा आहे आंतरराज्यीय वस्तूविनिमय व्यवहारांवर करआकारणी करण्याचा. एका राज्यात निर्माण केली गेलेली वस्तू ज्या वेळी दुस-या राज्यात विकली जाते त्या वेळी ज्या राज्यात तिचे उत्पादन केले गेले त्या राज्यातील विक्री कराचा दर त्या विनिमयावर आकारायचा की, जिथे विक्रीचा व्यवहार प्रत्यक्षात घडला त्या राज्यात लागू असणा-या दराने विक्री कराची आकारणी व वसुली करायची, असा तो मुद्दा त्या वेळी उपस्थित झालेला होता. ज्या राज्यात त्या वस्तूची निर्मिती केली गेली त्या राज्यात आकारल्या जाणा-या दराने, समजा, विक्री कर आकारला तर प्रश्न असा निर्माण होतो की, ज्या राज्यात विक्रीचा व्यवहार घडलेला आहे त्या राज्यातील मतदारांनी काही विक्री कराचा दर ठरवणारे दुस-या राज्यातील सरकार निवडलेले नाही. मग, जे सरकार त्या राज्यातील जनतेला जबाबदार नाही त्या सरकारने ठरवलेल्या दराने कराची आकारणी व वसुली करणे कितपत संयुक्तिक ठरेल ? मग, केंद्र सरकार ज्या दराने केंद्रीय विक्री कर आकारते त्या दराने अशा प्रकारच्या आंतरराज्यीय व्यवहारांवर विक्री कराची आकारणी करावयाची, असा निवाडा व्यवहारात आला. केंद्रीय विक्री कराच्या दरानुसार कराची आकारणी व वसुली राज्य सरकारने करावी, अशी व्यवस्था त्या नंतर व्यवहारात रूढ झाली.

वस्तू व सेवा कराच्या निमित्ताने आपल्या देशातील अप्रत्यक्ष कररचनेचा फेरविचार जो सुरू झाला, त्याची पार्श्वभूमी ही अशी आहे. या फेररचनेचे एकंदर तीन पैलू सांगता येतील. केंद्र सरकारच्या अधीन असलेले अबकारी कर आणि सीमा शुल्क या दोन करांची फेररचना हा झाला पहिला पैलू. तर, विक्री कराच्या रचनेची फेरमांडणी हा ठरतो दुसरा पैलू. यांतील तिसरा पैलू जो आहे तो राज्याराज्यांत विद्यमान असणा-या विक्री कर व्यवस्थेमध्ये काही किमान समान चौकट लागू करण्याबाबतचा. विक्री करांचे दर, त्यांची आकारणी पद्धती, करविषयक नियम, सवलती यांबाबत आपल्या देशातील राज्याराज्यांत प्रचंड वैविध्य आणि तफावत आहे. त्यांमुळे ही सगळीच व्यवस्था ज्या प्रमाणे किचकट बनलेली आहे त्यांचप्रमाणे नाना प्रकारच्या अनियमिततांना फोफावण्यासही तिने बराच वाव ठेवलेला दिसतो. उद्योगांचे स्थानांकनही त्यांमुळे प्रभावित होतेच.

**सक्षम मंत्रिसमितीचे व्यासपीठ**

राज्याराज्यांत विद्यमान असणा-या विक्री करव्यवस्थेतील या त्रुटींचा निपटारा घडवून आणत संपूर्ण देशात लागू करता येईल अशी विक्री कराची काही किमान समान चौकट सर्व राज्यांनी एकत्र बसून ठरवावी, अशा प्रकारच्या विचारमंथनाला २००१ सालापासून आपल्या देशात गती मिळाली. देशातील सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांचा समावेश असलेल्या एका सक्षम समितीची निर्मिती त्या मंथनातून साकारली. पश्चिम बंगालचे तत्कालीन अर्थमंत्री असीम दासगुप्ता हे त्या समितीचे अध्यक्ष होते. या समितीच्या निर्मितीमुळे दोन मोठ्या सुधारणा शक्य बनल्या. विक्री कराच्या आकारणीबाबत राज्याराज्यांत वस्तूवस्तूंमध्ये असलेली प्रचंड तफावत किमान पातळीवर आणून ठेवत विक्री कराच्या आकारणीमधून सवलत द्यावयाच्या जिनसांची एक सामाईक यादी तयार झाली, ही या समितीची पहिली उपलब्धी. तर, विक्री कर आकारणीपात्र वस्तूंची एकंदर तीन गटांमध्ये विभागणी करून त्या त्या वस्तूगटांना विविक्षित दरांनी विक्री कर लागू करण्याची पद्धती राज्याराज्यांमध्ये अवलंबली गेली, ही झाली त्या समितीची दुसरी कमाई.

वस्तू व सेवा करप्रणालीला मूर्त स्वरूप प्रदान करण्याच्या कामी अर्थमंत्र्यांच्या त्या सक्षम समितीच्या व्यासपीठाची मोठीच मदत झाली. मुख्य म्हणजे, करविषयक विविध सुधारणांसंदर्भात आपापल्या शंका व सुप्तासुप्त भीती व्यक्त करण्यासाठी या समितीच्या रूपाने राज्य सरकारांना एक व्यासपीठ व अवकाश आपल्या व्यवस्थेमध्ये तयार झाला. सेवा कर लागू करण्यासंदर्भातील विविध प्रस्ताव, त्यांसाठी कराव्या लागणा-या घटनात्मक सुधारणा अथवा बदल यांबाबतचा तपशील या समितीसमोर प्रथम सादर करण्यात यावा, अशा प्रकारची मागणी नोंदवणे राज्य सरकारांना या व्यवस्थेमुळे शक्य बनत राहिले. राज्योराज्यींच्या अर्थमंत्र्यांचा समावेश या समितीमध्ये असल्याने, या समितीचे मत अजमावून मगच पुढील पावले उचलली जावीत, असे प्रतिपादन करण्याची सोय राज्यांना आता उपलब्ध झालेली होती. प्रथम २००१ साली कार्यान्वित करण्यात आलेल्या सक्षम मंत्रिसमितीमुळे हा व्यवस्थात्मक पर्याय राज्यांना खुला झाला.



वस्तू व सेवा कराशी संबंधित या सगळ्या चर्चेला चौकट व गती प्राप्त झाली ती केंद्र सरकारने २००२ साली नियुक्त केलेल्या एका कृतिगटामुळे. भारतीय अर्थव्यवस्थेतील बदलत्या वास्तवाची दखल घेणारी वैधानिक चौकट नव्याने निर्माण करण्याची गरज ठोसपणे मुखर केली ती डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या त्या कृतिगटाने. वस्तू व सेवा करप्रणाली आपल्या देशात लागू करण्याच्या दृष्टीने घटनात्मक तसेच कायदेशीर पावले उचलण्याची निकड त्या कृतिगटाने त्याच्या अहवालात नमूद केली. २००४ सालापासून त्या दिशेने आपल्या देशात मग चर्चा सुरू झाली. केंद्र सरकार तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचीमध्ये निर्देश असलेल्या सेवांवर देशभरात एकाच दराने आणि एकाच पद्धतीने करआकारणी करत संपूर्ण देशाला एकसंध व ख-या अर्थाने सामाईक बाजारपेठेचे स्वरूप प्रदान करणारी व्यवस्था व्यवहारात जारी करण्याबाबत चर्चामंथनाला तेव्हापासून खरी गती व दिशा मिळाली. वस्तू व सेवा कराची प्रणाली व्यवहारात लागू केल्याने देशभरातील बाजारपेठ अधिक एकवट बनेल, हा युक्तिवाद त्या संपूर्ण भूमिकेच्या मुळाशी होता.

आता, हा युक्तिवाद व्यवहारात आणायचा तर त्यांसाठी काही किमान पूर्वतयारी करणे अनिवार्य ठरते. मुख्य म्हणजे, वस्तू व सेवा कराची प्रणाली लागू झाल्यानंतर केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांच्या अखत्यारीमध्ये आजमितीस असलेल्या करांपैकी कोणते कर खालसा होतील, त्यांची यादी करणे ही सर्वाधिक प्राथम्याची बाब ठरते. केंद्र सरकारच्या तंबूतून हे चित्र बघावयाचे ठरले तर; केंद्र सरकारचा अबकारी कर, काही प्रकारची औषधी द्रव्ये तसेच सुगंधी द्रव्यांवर आकारला जाणारा अबकारी कर; काडेपेट्या, कागद यांसारख्या काही महत्त्वाच्या व देशभरात सर्वत्र वापरल्या जाणा-या जिनसांवर आकारण्यात येणारा विशेष अबकारी कर, कापड व कापडजन्य जिनसांवर आकारण्यात येणारा अतिरिक्त अबकारी कर, काही प्रकारची अतिरिक्त सीमा शुल्के, विशेष अतिरिक्त सीमा शुल्क हे सर्व कर वस्तू व सेवा कराची प्रणाली देशभरात लागू झाल्यानंतर बासनात गुंडाळले जातील. त्यांबरोबरच या करांवरील अधिभार व उपकरही खालसा होतील. ***(कृपया पृष्ठ क्रमांक ३४ पाहावे).***

जिकडेतिकडे - १

# पक्ष्यांमधील घटस्फोट

प्रेमाची भावना जशी माणसात आहे, तशीच ती प्राण्यांमध्ये आणि पक्ष्यांमध्येही आहे. प्रेम भावनेतून माणसे एकत्र येतात, संसार थाटतात, मुलांना जन्म देतात आणि नाही पटले तर विभक्त होतात. पक्ष्यांमध्येही गोष्टी अशाच क्रमाने घडतात असे म्हटले तर आश्चर्य वाटायला नको! संशोधन सांगते की, पक्ष्यांमध्ये विभक्त होण्याचा दर हा पक्ष्यांच्या जातीनुसार बदलतो. काही जातींमध्ये तो नव्वद टक्क्यांच्या वर असतो तर काही जातींमध्ये शून्य टक्के इतकाही असतो.

जवळ-जवळ पंच्याऐंशी टक्के जातींमध्ये नर आणि मादी एकत्र संसार थाटतात, पिलांना जन्म देऊन त्यांचा एकत्र सांभाळ करतात, कामाची जबाबदारी विभागून घेतात. त्यांचे हे सहजीवन पाहिल्यावर ते एक पत्नीधारी आणि एक पतीधारी असावेत अशी शंका येते. पण प्रत्यक्षात मात्र यांपैकी ९२ टक्के पक्ष्यांमधील नर आणि मादी काही काळ एकत्र व्यतीत केल्यानंतर विभक्त होतात. Biological Review या नियतकालिकात म्हटल्याप्रमाणे पक्ष्यांमध्ये विभक्त होण्याची कारणे माणसांपेक्षा वेगळी असतात. विभक्त होणे ही त्यांच्यासाठी परिस्थिती अनुरु प स्वतःच्या वर्तनात बदल करण्याची प्रक्रिया असते.

ऑक्सफर्ड विद्यापीठातील Antica Culina आणि त्यांच्या सहका-यांनी पक्ष्यांमधील नर आणि मादी यांचा जोडीने अभ्यास केला. त्यांना दिसून आले की, विणीच्या हंगामात काही वेळा मादी कमी अंडी घालते किंवा उशीरा अंडी घालते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जेव्हा मादी कमी अंडी घालते किंवा उशीरा अंडी घालते, तो हंगाम त्या नर आणि मादीचा प्रजोत्पादनासाठी एकत्र येण्याचा शेवटचा हंगाम असतो. मादीचा कमी अंडी घालण्याचा आणि शेवटचा हंगाम असण्याचा काय संबंध असावा, याचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, एका हंगामात अंडी किती घालायची ते मादी ठरवते. त्यावर तिचेच नियंत्रण असते. मग शेवटच्या हंगामातच मादीने कमी अंडी घालण्याचे कारण काय? Culina म्हणतात की, मादी कमी अंडी देते याचाच अर्थ तिला नराला स्वतःपासून परावृत्त करायचे असते. अंडी घालतानाच नराला सोडचिठ्ठी देण्याचा तिचा निर्णय झालेला असतो. नराला मात्र याची काहीच कल्पना नसते. कमी अंडी बघून खट्टू झालेला नर कदाचित पुढच्या विणीच्या हंगामात ही परिस्थिती कशी बदलता येईल याचाही विचार सुरु करत असावा.

बाथ विद्यापीठातील Tamas Szekely यांचे संशोधन सांगते की, विभक्त होण्याचा निर्णय मादी घेते कारण, तो तिच्यासाठी फायद्याचा असतो. एकाच नराबरोबर वारंवार संसार थाटण्यापेक्षा दुसरा एखादा चांगला नर तिला मिळू शकतो. त्याच्यामुळे तिच्या जननक्षमतेत वाढ होते आणि त्या जातीच्या पक्ष्यांची संख्याही वाढते. पण Szekely पुढे असेही म्हणतात की, निवड करण्यासाठी आसपास नरांची संख्या मर्यादित असेल आणि तिला योग्य तो पर्याय मिळत नसेल तर या विभक्त होण्याचे खूप घातक परिणाम त्या जातीवर होऊ शकतात.

Culina यांच्या अभ्यासाचे निष्कर्ष सांगतात की, जेव्हा नर आणि मादी विभक्त होतात, त्या वेळी मादीचा फायदा होतो पण विभक्त झालेल्या नराच्या जननक्षमतेत मात्र कोणतीही सुधारणा होत नाही. थोडक्यात, पक्ष्यांमध्ये विभक्त होण्याचा निर्णय मादी घेते आणि त्याचा फायदाही तिलाच होतो. उलट जे नर मादीला सोडण्याचा निर्णय घेतात, त्यांना स्वतःलाच तो परिसर सोडून जाण्याची वेळ येते. यात त्यांचेच जास्त नुकसान असते. मादी विभक्त होण्याचा निर्णय का घेते? त्याची काय कारणे असू शकतात? तिला नराचे वर्तन आवडेनासे होते की दुसरा एखादा नर आवडू लागतो, याबाबत ठोस माहिती मात्र अद्याप हाती आलेली नाही.

*अल्बॅट्रॉस या समुद्रपक्ष्यांमध्ये नर आणि मादी विभक्त होत नाहीत. ते आयुष्यभर एकमेकांशी प्रामाणिक राहतात. प्रेम आणि बांधिलकी या भावना आपण माणसांशी निगडीत आहेत असे मानतो. पण खरे प्रेम, बांधिलकी अनुभवायची असेल तर अल्बॅट्रॉसचे सहजीवन पाहायला हवे.*

जिकडेतिकडे - २

# हेरांची देहबोली

गुप्तहेर या नावाभोवती कायमच एक गूढ वलय असते. वेशभूषा आणि केशभूषा बदलून, स्वतःच्या व्यक्तिमत्वात आमुलाग्र बदल करुन शत्रूपक्षाच्या गोटातील बित्तंबातमी मिळवणे ते त्याचे काम आव्हानात्मकच असते. पण आजकालच्या काळात आपली गुप्त माहिती शत्रूच्या हाती लागू नये म्हणून अशा हेरांना अचूक शोधून काढणे हे जास्त कौशल्याचे काम झाले आहे. हेर कसा ओळखायचा याचे प्रत्येक देशाचे शास्त्र वेगवेगळे असू असते. पण अलीकडच्या काळात जगातील अनेक देशांमधील परस्पर अस्थिर संबंध आणि दहशतवादी कारवायांमुळे ब-याच देशांना हेरगिरीवर पाळत ठेवण्यासाठी नवनवीन गोष्टींची मदत घ्यावी लागत आहे. अमेरिकेसारखे राष्ट्र याबाबतीतही आघाडीवर आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात माणसाच्या प्रत्यक्ष बोलीपेक्षा त्याची देहबोली जास्त खरे बोलते. त्यामुळे एखादा उच्चायुक्त किंवा राजकीय नेता कितपत खरे बोलतो आहे, त्याचे बाहेरचे वागणे, बोलणे एक आणि त्याचा छुपा हेतू दुसराच तर नाही ना, हे तपासणे या देहबोलीच्या अभ्यासामुळे शक्य झाले आहे. आजकाल परदेशातील उच्चायुक्त, राजकीय नेते यांच्यावर दुहेरी जबाबदारी असते. आपल्या नेमून दिलेल्या कामाबरोबर ते हेरगिरीही करत असतात. त्यांच्यातील या हेराच्या हालचाली कशा ओळखायच्या, त्यांचे अंतर्गत हेतू कसे तपासून पाहायचे, यासाठी अमेरिकेत अनेक संस्था देहबोलीच्या अभ्यासाचे प्रशिक्षण देत आहेत. चेह-यावरील हावभाव, हातवारे, चालण्याची ढब, धुम्रपान करण्याची सवय, वारंवार घड्याळ पाहण्याची सवय यांसारख्या छोट्या-छोट्या गोष्टींत बरेच अर्थ दडलेले असतात. अमेरिकेतील 'Federal Bureau of Investigation' या गुप्तचर संघटनेचे माजी अधिकारी Joe Navarro यांनी १९९९ पासून 'Behavioural Analysis Programme' हा नवीन अभ्यासक्रम



प्रशिक्षणार्थींसाठी सुरु केला. त्यांनी प्रशिक्षण दिलेल्या प्रतिनिधींनी रशियन उच्चायुक्ताच्या सूचक हालचालींचा, देहबोलीचा अभ्यास करुन त्याने एका विभागीय कार्यालयात गुप्तपणे बसवलेले ध्वनीग्राहक यंत्र शोधून काढले. त्यांचे हे यश पाहून अनेक अमेरिकी सरकारी संरक्षण संस्थांनी देहबोलीचा अभ्यास असणा-या तज्ज्ञांची नेमणूक करण्यास सुरुवात केली आहे. पेंटागॉनचे 'थिंक टँक' असणारे 'Office of Net Assessment' तर २००९ पासून आजपर्यंत प्रतिवर्षी यासाठी जवळ-जवळ तीन लाख डॉलर खर्च करत आले आहे.

'American Defence Contractor' या संस्थेच्या माजी सल्लागार Martha Davis म्हणतात की, या प्रकारात तीस मिनिटांचा व्हिडीओ समजून घेण्यासाठी वीस तास घालवावे लागतात. कुणीतरी अस्वस्थपणे किंवा संशयित हालचाली करत आहे, त्यातून तो खोटे बोलतो आहे, असा निष्कर्ष काढण्याइतपत ते सोपे नसते. उलट त्यांनी बोलताना केलेली विशिष्ट विधाने हेरणे, त्यांची छाननी करणे, ही खरी क्लृप्ती असते. ब-याचदा पुढच्या माणसाला चकवण्यासाठी ही माणसे जे म्हणायचे आहे त्यापेक्षा

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**
**यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

विरुध्द किंवा वेगळे हावभाव दाखवतात, हालचाली करतात. पण एखादा मनाविरूध्द दाखवलेला अगदी लहानात लहान भावही त्यांच्या छुप्या भावना उघड करतो. 'Paul Ekman Group' चे संचालक Paul Ekman म्हणतात की, माणसाच्या हालचालींतून अर्थ काढण्यासाठी संदर्भ खूप महत्त्वाचा असतो. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची फेब्रुवारी महिन्यातील देहबोली पाहिली तर लक्षात येते की, त्यांच्या भाषणांत नेहमीसारखा आत्मविश्वास नाही. याच काळात रशियाने युक्रेनपासून क्रिमिया हिरावून घेण्याचा डाव आखला होता. पण जेव्हा त्यांना कळले की, पाश्चात्य देश यात कोणताही हस्तक्षेप करणार नाहीत, तेव्हा त्यांच्या देहबोलीत स्थिरता आणि पूर्वीचा आत्मविश्वास आला.

Paul Ekman यांच्या ग्राहक वर्गामध्ये न्यूयॉर्क पोलीस, दहशतवाद विरोधी पथके, गुप्तचर संस्था यांसारख्या महत्त्वाच्या संस्थांचा समावेश आहे. दहशतवादी कारवायांमध्ये किंवा इतर कारवायांमध्ये हाती लागलेले गुन्हेगार खरे बोलत आहेत की नाही हे तपासण्यासाठी देहबोलीच्या अभ्यासाचा खूप उपयोग होतो असे त्यांचे म्हणणे आहे.

१९७९ सालच्या एका इस्त्रायली मासिकात Amatzia Baram यांचा एक लेख प्रसिध्द झाला होता. त्यात त्यांनी सद्दाम हुसैन यांच्या देहबोलीवरून काही भाकिते वर्तवली होती. त्यांनी लिहिले होते की, सद्दाम हुसैन इस्त्रायलचा तिरस्कार करतात हे तर खरेच ! पण इस्त्रायलपेक्षाही जास्त तिरस्कार ते इराणचा करतात आणि म्हणूनच ते नजिकच्या काळात इराणवर आक्रमण करण्याची शक्यता आहे. Amatzia Baram यांचे भाकित खरे ठरले. कारण हा लेख प्रसिध्द झाल्यानंतर अवघ्या अकरा महिन्यांच्या काळातच इराकचे रणगाडे इराणमध्ये घुसले आणि एका युध्दपर्वाला सुरुवात झाली.

अमेरिकेबरोबरच इतर देशांनीही आता आंतरराष्ट्रीय राजकारणात वावरताना देहबोलीची मदत घेणे सुरु केले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाची एकंदर दिशा पाहता गेल्या काही वर्षांत बराक ओबामा, डेव्हिड कॅमेरुन, अँजेला मर्केल यांची देहबोली ब-याच देशांतील गुप्तचर यंत्रणांसाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. ■■



*(पृष्ठ क्रमांक २८ वरून)*

आता, राज्य सरकारांच्या गोटातून हे चित्र न्याहाळायचे झाल्यास ते कसे दिसेल हेही बघू. राज्य सरकारे आजघडीला आकारत असलेला विक्री कर अथवा मूल्यवाढावा कर, आंतरराज्यीय वस्तुविनिमयव्यवहारांवर आकारण्यात येणारा केंद्रीय विक्री कर, चैनीवरील कर (लक्झरी टॅक्स), जकातीऐवजी अनेक राज्य सरकारे आजमितीस आकारत असलेला प्रवेश कर, करमणूक कर, जाहिरातींवरील कर, लॉट-या तसेच सट्टेबाजीच्या व्यवहारांवर आकारण्यात येणारा कर... हे सगळे कर वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर व्यवहारातून रद्द होतील.

एका दृष्टीने आपल्या देशातील अप्रत्यक्ष करांची संपूर्ण व्यवस्था सध्या संधिकाळातून मार्गक्रमण करते आहे. साहजिकच, या संधिकाळात आपाततः उद्भवणा-या अडचणी व समस्यांचा सामना करणे आपल्याला क्रमप्राप्त आहे. देशातील प्रचलीत करव्यवस्थेमध्ये आजवर ज्या ज्या सुधारणा जारी केल्या गेल्या त्या सगळ्या सुधारणा भारतीय घटनेच्या विद्यमान तरतुदींच्या चौकटीत राहतील यांबाबतची दक्षता आपण घेत आलो. परंतु, वस्तू व सेवा कराची प्रणाली अंगिकारावयाची तर घटनात्मक तरतुदींमध्येच आता बदल/सुधारणा करणे भाग आहे. सर्वांत मुख्य म्हणजे, करआकारणी संदर्भातील केंद्र सरकारच्या क्षमतांची व्याप्ती स्पष्ट करणा-या घटनादत्त कलमांच्या स्वरूपातच बदल करणे आता अनिवार्य ठरणार आहे. हे संभाव्य बदल खरोखरच मूलभूत स्वरूपाचे असणार आहेत.

कोणते कर केंद्र सरकारने राज्य सरकारांबरोबर वाटून घ्यावयाचे व कोणते नाहीत, यांबाबत संभवणारे बदल हे सगळ्यांत कळीचे ठरावेत. आजवर आपल्या व्यवस्थेत विद्यमान असलेले बहुतेक कर हे उत्पादनाधारित होते अथवा आहेत. आता त्यांच्या स्वरूपामध्ये बदल होऊन ते उपभोगाधारित बनवायचे आहेत. करांमुळे उत्पादनाला, उत्पादनाच्या प्रेरणेला कोठेही खीळ बसता कामा नये, हा जगभरच एक सर्वमान्य आर्थिक संकेत गणला जातो. करआकारणीद्वारे नियमन करावयाचे ते उत्पादनाचे नाही तर उपभोगाचे. आपल्या देशात येऊ घातलेल्या अप्रत्यक्ष करविषयक स्थित्यंतरात सर्वांत संवेदनशील मुद्दा ठरणार आहे तो नेमका हाच. ■■

उजळणी

# स्मरण, प्रेरक आणि मार्गदर्शक बोलांचे...

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीवर्षाला यंदाच्या १४ एप्रिलपासून सुरुवात झाली. १४ एप्रिल १८९१ हा बाबासाहेबांचा जन्मदिवस. म्हणजेच, १४ एप्रिल २०१५ या दिवशी त्यांच्या जन्माला १२४ वर्षे पूर्ण झाली. माणसाचे शारीर अस्तित्त्व अस्तंगत झाले तरी विचाररूपाने व्यक्ती समाजमनात चिरंजीव राहते. त्यांतल्या त्यांतही पुन्हा, बाबासाहेबांसारख्या द्रष्ट्या, असाधारण बुद्धिलेणे ल्यालेल्या प्रगल्भ विचारवंतांचे विचारधन समाजपुरूष सततच पोषक पाथेय म्हणून आपल्या जीवनप्रवासात जपत असतो. असामान्य कर्तृत्वाने समाजजीवन उजळून टाकणा-या लोकाग्रणींच्या विचारविश्वात कालसापेक्ष चिंतनाप्रमाणेच कालातीत मंथनाचे अंशदेखील विपुल प्रमाणात सापडतात. बाबासाहेबांनी स्थळकाळपरत्वे व्यक्त केलेल्या विचारधनातील काही प्रेरक, मार्गदर्शक आणि आजच्या काळातही संदर्भ तितकाच ताजा असलेल्या विचारशलाकांची उजळणी त्यांच्या जयंतीच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षामध्ये करण्याचा प्रयत्न इथून पुढे आपण करणार आहोत.

***मुलांच्या संबंधाने आईबापांची कर्तव्यकर्मे काय...***

*"सर्वांनी बरोबरीचे नाते राखून, एकमेकांस प्रसंगोपात्त मदत करून, जेणेकरून समाजात सौख्य नांदेल अशा रीतीने आपले वर्तन ठेवणे हाच समाजरचनेचा आद्य हेतू आहे. ज्या वेळी समाजातील काही लोक प्रबल होऊन इतरांवर जुलूम करू लागल्यामुळे समाजसंघटनेचा हा हेतू सिद्धीस जात नाही असे दृष्टोत्पत्तीस येईल, त्या वेळी तेथेच चाचपडत न बसता, आपले सर्व उद्योग बाजूस सारून मोठ्या नेटाने श्रम करून प्रबळ झालेल्या त्या मदांधाची शेंडी धरून त्यास खाली वाकविणे हेच समाजातील प्रत्येक व्यक्तिमात्राचे कर्तव्यकर्म होय....परंतु अन्यायाचा प्रतिकार करण्यास सज्ज होण्याऐवजी आम्ही जुन्या चालीरीतीस कवटाळून अगदी खंगत चाललो आहोत. असे होण्याचे कारण हेच की मुलांच्या संबंधाने आईबापांची*



*कर्तव्यकर्मे काय आहेत, याकडे आपल्या लोकांनी पाहिजे तितके लक्ष पुरविले नाही. नसत्या जबाबदा-या आपल्या डोक्यावर घेतल्यामुळे व त्या हव्या तशा हातून न वठल्यामुळे आपल्यातील आईबाप मुलांच्या नाशास कारणीभूत होतात. आपल्यात बापाने मुलाचे लग्न केलेच पाहिजे ही नसत्या जबाबदारीपैकी एक जबाबदारी आहे. लग्न करून संसाराची जमवाजमव होते न होते तो इकडे मुलांची परंपरा सुरू झालीच. चारपाच वर्षांत एक दोन पोरे जयदत्त म्हणून पुढे उभी ! ती वाढली न वाढली तो त्यांची नवीन भावंडे त्यांच्या पाठीवर पाय देऊन आली ! पहिल्यांची लग्ने होत नाहीत तो मागल्यांची येऊन ठेपली. मग पोरांच्या पोरांची काळजी ! हा प्रकार वरिष्ठ लोकांतही आहे, पण याचे अनिष्ट परिणाम जितके आमच्या लोकास भोवतात तितके ते त्यांना भोवत नाहीत. याचे कारण असे की जरी ते लोक लग्न करण्याचे काम आपल्या शिरावर घेतात तरी त्याबरोबर जेणेकरून मुलगा स्वावलंबी व त्याच्यावर लादलेला प्रपंच आणि त्याच्यावर येणारी प्रजोत्पादनाची व पालनाची जोखीम घेण्यास सामर्थ्यवान होईल, अशा प्रकारचे शिक्षण त्यास देण्याची काळजी घेतात. आमच्यातील लोक मुलांचे लग्न करून देण्यापलीकडे काही करीत नाहीत. एकतर कर्ज काढून लग्न करावयाचे. मुलगा अडाणी असल्यामुळे व त्यास स्वतंत्रपणे कमाई करण्याची धमक नसल्यामुळे आधीच तो कर्जाखाली चेंगरून जातो व त्याचा प्रपंच त्याला भागत नाही. इतक्यात त्याला मुले झाली म्हणजे तो आणखी एक भार त्याच्यावर पडतो. त्यांना शिक्षण देऊन आपल्यापेक्षा चांगल्या स्थितीत आणण्यास जवळ ऐपत नसते. इकडे त्याचा प्रपंच वाढत चालल्याने आपल्या उत्पन्नात भर पडावी म्हणून आपल्या मुलांना त्यांच्या अज्ञानी व अडाणी स्थितीत कोठे तरी तो उद्योगास लावतो व त्याच्या कमाईवर आपला संसार चालवितो. लग्नाच्या फे-यात बाप बुडत असतो. पण तो काही शहाणपण शिकत नाही. उलट तो आपल्या मुलांस त्याच गर्तेत लोटून देऊन साफ बुडवितो !"* ■■

**(संदर्भः निपाणी येथे आयोजित करण्यात आलेल्या मुंबई इलाखा प्रांतिक बहिष्कृत परिषदचे तिसरे अधिवेशन. तारीख १० व ११ एप्रिल १९२५. बाबासाहेबांच्या अध्यक्षीय भाषणाची तारीख ११ एप्रिल १९२५).**

### प्रमुख संदर्भ

**(A) Magazines -** (1) Geographical, July 2011 (2) Down To Earth, 1-15 January 2015 (3) Economist, 24-30 January 2015 (4) New Scientist, November 2014 **(B) Books/Reports -** (1) The Andean Republics, Time-Life Books, New York, 1965. **(C) Websites -** 1.http://www.britannica.com/topic/354719/Machu-Pichu, 2. http://en.wikipedia.org/wiki/Machu-Pichu, 3. http://en.wikipedia.org/wiki?Hiram_Bingham_III, 4. http://www.evolvingbeings.com/easy/book-review-lost-city-of-the-incas, 5. http://en.wikipedia.org/wiki/Segmented_sleep. 6. http://www.bbc.co/news/magazine-16964783 ■■

**Poverty in India**

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

**कर्ता-करविता**

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रुपये**



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८०/ - रुपये**

**त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

# ग्रंथालयातील पुस्तके

**Being Mortal : Medicine and What Matters in the End, Atul Gawande, Penguin Books, New Delhi, 2014, pp 282, Price Rs. 599/-**

प्रयत्नांची पराकाष्ठा करून रुग्णाला जीवनदान देणे हे वैद्यकीय तज्ज्ञांचे प्राथमिक व नैतिक कर्तव्य आहे. तर दुसरीकडे, असाध्य आजार असल्याने रुग्णावर उपचार करणे व्यर्थ आहे, किंबहुना उपचार केल्याने रुग्णाला अधिक शारीरिक त्रास होऊ शकतो अशी काही रुग्णांची स्थिती असते. अशा वेळी त्यांच्यावर उपचार करावे की न करावे असा प्रश्न वैद्यकीय तज्ज्ञांपुढे उभा ठाकत असतो. शिवाय, आपण करू त्या उपचारांना रुग्णाच्या शरीराचा कसा प्रतिसाद मिळेल याबाबतही त्यांना स्पष्टता होणे कठीण असते. अशा वेळी तज्ज्ञांनी कोणती भूमिका घ्यावी याबाबत त्यांच्या मनात असलेला संभ्रम आणि तो दूर करण्यासाठी काय करता येईल याबाबतची चर्चा प्रस्तुत ग्रंथाने केली आहे. रुग्णाला जगवणे हे वैद्यकशास्त्रात शिकवले जाते, पण असाध्य रोगग्रस्त असलेल्या आणि येथून पुढे उपचार करणे व्यर्थ आहे अशी स्थिती असलेल्या रुग्णाला व त्याच्या नातेवाईकांना मृत्यूचे वास्तव तज्ज्ञांनी सांगावे का, ते कशा पद्धतीने सांगावे याबाबतचा अभ्यासपूर्ण ऊहापोह या पुस्तकात मांडण्यात आलेला आहे. रुग्ण आणि आजारपणात त्याची सेवा घेणारे नातेवाईक या सर्वांची वैद्यकीय तज्ज्ञांबरोबर होणारी चर्चा यांतून हा विषय अलगदपणे उलगडला जातो. एकेक रुग्ण म्हणजे तज्ज्ञांसाठी एक 'केस स्टडी'च असते. अशा अनेक 'केस स्टडीज'मधून आपली भूमिका स्पष्ट होत जाण्याची घडलेली एका वैद्यकीय तज्ज्ञाची मानसिक प्रक्रिया या ग्रंथातून पुढे येते. प्रत्यक्ष आपल्या वडिलांची मृत्यूकडे होणारी वाटचालही लेखकाने शब्दबद्ध केली आहे. माणसांचे आयुर्मान वाढण्याच्या, त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञान व औषधे उपलब्ध होण्याच्या आणि रुग्णसेवा महाग होत असण्याच्या या काळात हे पुस्तक सर्वांनीच वाचावे असे आहे. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Postal Regn.No.: PCW/115/2013-2015**
**Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**